**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम,2005 कलम 19(1) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिलाचे कामकाज**

प्रथम अपील क्रमांक-
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र साप्रवि/आस्था-8/मासे/202/2019
नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
दिनांक 5 /3 /2019

1.श्री. प्रशांत वसंतराव देशमुख
1 गायत्री रो हाऊसेस, महाजन नगर,
इंद्रप्रस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर,
अबंड,नाशिक-422010 } अपिलार्थी ...

**--विरुध्द--**

1.श्री.रणजीत अरूण पगारे,
जन माहिती अधिकारी तथा
कनि.प्रशा. अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक } उत्तरवादी ...

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) नुसार प्रथम अपिल**

| दिनांक | अपिलाचे थोडक्यात स्वरुप | स्वाक्षरी |
|---|---|---|
| दिनांक ~~18/2/2019~~ 5/3/19 | श्री. प्रशांत वसंतराव देशमुख, 1 गायत्री रो हाऊसेस, महाजन नगर, इंद्रप्रस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर, अबंड, नाशिक- 422010 अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग (साप्र) जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस, जाहिरात क्र.1/2010 नुसार झालेल्या परिचर पद भरतीत जास्त गुण असुन देखील निवड यादीत नावाचा समावेश नसल्या बाबतचे कारण मिळणे बाबत.- वरील जाहीराती नुसार झालेल्या परिचर पद भरतीत श्रीम. सविता भास्कर दाते (खुला महिला) आसन क्र. 7385 या उमेदवारांपेक्षा श्रीम. दाते या उमेदवाराचे (एकुण गुण 62.6) इतके जास्त असुन देखील निवड यादीत नाव असलेल्या काही खुला महिला उमेदवरांपेक्षा श्रीम. दाते यांचे एकुण गुण जास्त असुन देखील त्यांच्या नावाचा समावेश निवड यादित कुठल्या कारणामुळे झालेला नाही? ते कारण मिळावे. दिनांक. 6/12/2018 चा अर्ज कार्यालयास दिनांक 6/12/2018 रोजी व संकलनास दिनांक 10/12/2018 रोजी प्राप्त झाला होता.<br>अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे मुळ अर्जात नमुद माहिती ही साप्रवि आस्था-4 संकलनाशी निगडीत असल्याने व सदर मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणे करिता माहिती अधिकार मुळ अर्ज दिनांक 12/12/2018 अन्वये सदर आस्था 4 संकलनांकडे वर्ग करण्यात आला होता.<br>अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 2 (च) नुसार व्याख्येत बसत नसलेने माहिती देय होत नाही. करिता आपण दिनांक 06/12/2018 रोजीचे अर्जान्वये मागणी केलेली जाहिरात क्र.01/2010 नुसार झालेल्या परिचर पद भरतीत जास्त गुण असुन देखील निवड यादीत नावाचा समावेश नसल्याबाबतचे कारण मिळणे बाबतची बाब जन माहिती अधिकारी यांचे कार्यकक्षेत येत नाही. असे जा.क्र.साप्रवि/आस्था 4/1726/2018 दिनांक 28/12/2018 अन्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते. तत्राप,अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक 28/12/2018 चे पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 19 (1) नुसार दि.7/1/2019 रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला होता. | हजेरी पत्राप्रमाणे |

अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक.28/1/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक यांच्या दालनात ठेवण्यात आली. सदर सुनावणीस श्री.रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक, आस्था-4 संकलनाचे श्रीम.शितल शिंदे, क.सहा. रजेवर होते त्यामुळे श्री. महेंद्र पवार, सहा. जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प. नाशिक उपस्थित होते. श्री. प्रशांत वसंतराव देशमुख, अपिलार्थी उपस्थित होते.

सुनावणी दरम्यान देखील श्री. प्रशांत देशमुख यांनी लेखी युक्तीवाद सादर केला . 1)अपिलकार यांनी मागितलेली माहिती कलम 4 (1) (ग) नुसार श्रीम. सविता भास्कर दाते यांचे एकुण गुण निवड झालेल्या त्यांच्या प्रवर्गातील इतर उमेदवारांपेक्षा जास्त असुन देखील त्यांचे नाव निवड यादित कोणत्या कारणास्तव समावेश झालेला नाही असे निर्णय जाहिर करतांना संबंधित वस्तुस्थिती स्वत: होऊन प्रसिध्द करणे बंधनकारक होते. 2) कलम 4 (1)(घ) नुसार आपल्या न्यायीकवत निर्णयाबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवणे आवश्यक होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिल अर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता सहा.जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थी यांना , मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 2 (च) नुसार व्याख्येत बसत नसलेने माहिती देय होत नाही. करिता आपण दिनांक 06/12/2018 रोजीचे अर्जान्वये मागणी केलेली जाहिरात क्र.01/2010 नुसार झालेल्या परिचर पद भरती जास्त गुण असुन देखील निवड यादीत नावाचा समावेश नसल्याबाबतचे कारण मिळणे बाबतची बाब जन माहिती अधिकारी यांचे कार्यकक्षेत येत नाही. असे जा.क्र.साप्रवि/आस्था 4/1726/2018 दिनांक 28/12/2018 अन्वये जन माहिती अधिकारी यांनी आस्था- 4 संकलनाने व्दारे कळविले आहे. सहा.जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तीवादावरून मी प्रथम अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**-: निर्णय :-**

श्री. प्रशांत वसंतराव देशमुख, अपिलार्थि यांचे दिनांक 6/12/2018 चे मुळ अर्जानुसार जाहिरात क्र.1/2010 नुसार झालेल्या परिचर पद भरती बाबत ची माहिती आस्था-4 संकलनाने माहितीचा किंवा नस्तीचा पुन:श्च शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच सन 2010 मधील परिचर पद भरती संदर्भात तत्कालीन सचिव व समिती कडुन लेखी स्वरुपात आस्था 4 संकलनाने विचारणाकरुन कारणमीमांसा खुलासा मागवावा. खुलासा प्राप्त झालेनंतर अपिलार्थी यांना खुलासा प्राप्त झालेच्या दिनांका पासुन 10 दिवसात उपलब्ध करुन दयावे.

सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे.

**(प्रदिप चौधरी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद,नाशिक**